# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक 21/03/2017 (का.प.क्र.14) रोजी झालेल्या (अर्थसंकल्पीय) सभेचे इतिवृत्त.

मंगळवार दिनांक 21 मार्च 2017 रोजी (का.प.क्र.14) मा.सभापती श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची (अर्थसंकल्पीय) सभा महानगरपालिका कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे दुपारी 4.00 वाजता वंदेमातरम् या गिताने सुरू झाली सभेला मा.आयुक्त श्री.ओम प्रकाश बकोरिया, नगर सचिव श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

| | |
|---|---|
| 1. | स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप |
| 2. | स.स.श्री.नितीन रमन चित्ते |
| 3. | स.स.श्री.सिताराम इसराम सुरे |
| 4. | स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी |
| 5. | स.स.श्री.विकास प्रकाश एडके |
| 6. | स.स.श्री.राजगौरव हरिदास वानखेडे |
| 7. | स.स.श्री.कैलास लक्ष्मण गायकवाड |
| 8. | स.स.श्रीमती शेख समीना इलियास |
| 9. | स.स.श्री.अजिम अहेमद रफिक |
| 10. | स.स.श्रीमती किर्ती महेंद्र शिंदे |
| 11. | स.स.श्रीमती संगिता सुभाष वाघुले |
| 12. | स.स.श्रीमती मनिषा बाळासाहेब मुंडे |
| 13. | स.स.श्री.सोहेल शकील शेख |

**विषय क्र. 168 :**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 103 व 104 अन्वये मा.आयुक्त यांनी स्थायी समितीकडे सादर केलेल्या सन 2016-2017 चे सुधारीत व कलम 95 अन्वये सादर केलेल्या सन 2017-2018 या वर्षीचे मुळ जमा व खर्चाचे अंदाजपत्रकावर विचार विनिमय करणे.

प्र.मुख्यलेखाधिकारी : सन 2016-17 चे सुधारीत व कलम 95 अन्वये सादर केलेल्या सन 2017-2018 या वर्षीचे मुळ जमा व खर्चाचे अंदाजपत्रक मा.आयुक्त हे मा.सभापती, स्थायी समिती यांचेकडे सादर करतील.

(या वेळी मा.आयुक्त यांनी मा.सभापती यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले तसेच मा.आयुक्त व समितीचे सर्व सदस्यांचे लेखाधिकारी यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत करतात.)

मा.आयुक्त : पावर पॉईंट प्रझेंन्टेशननुसार सभागृहास बजेट बाबतची माहिती देण्यात येते.

*माननीय सभापती -स्थायी समिती व सन्माननीय सदस्य महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ व १०४ नुसार २०१६-२०१७ चे सुधारित व कलम ९५ अन्वये सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षासाठी महानगरपालिकेच्या स्थापनेनंतरचा ३५ वा आणि प्रशासनामार्फत आयुक्त या नात्याने महानगरपालिकेत नियुक्तीनंतर माझ्या कार्यकाळातील दुसरे जमा व खर्चाचे मूळ आर्थिक अंदाज मा. स्थायी समिती सभेसमोर सादर करीत आहे. सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात शहरातील सर्व ऐतिहासिक व प्रेक्षणीय स्थळांचा विकास व्हावा व पर्यटक या शहराकडे आकर्षित व्हावेत या दृष्टीने रेल्वे स्टेशन येथे शहरात येणा-या पर्यटकांना शहर व शहराच्या आजु-बाजुच्या परिसरातील पर्यटक विषयक माहिती प्राप्त होणे संदर्भात महानगरपालिकेने* ***पर्यटन माहिती केंद्र*** *स्थापन केले आहे. महानगरपालिकेचे* ***गरवारे क्रीडा संकुल*** *येथे आंतरराष्ट्रीय दर्जाची खेळपट्टी व मैदान विकसीत करण्याचे काम प्रगती पथावर आहे तसेच सिडको एन-२ कम्युनिटी सेन्टर येथे* ***बॅडमिंटन हॉलचे*** *आधुनिकीकरण करण्यात येत आहे.*

*प्राचिन काळापासून प्रसिध्द असलेले हे शहर ऐतिहासिक वारसा लाभलेले आशिया खंडातील जलद गतीने विकसित होत असणारे शहर आहे. या ऐतिहासिक नगरीची प्रमुख संस्था असलेल्या महानगरपालिकेचे वार्षिक अंदाज तयार करतांना शहरातील सर्वच घटकांसाठी योग्य व पुरेशी आर्थिक तरतुद करणे हे माझे प्रमुख ध्येय आहे. आजमितीस ज्या गतीने या शहराची वाढ होत आहे त्या प्रमाणात महानगरपालिकेचे उत्पन्नाचे स्त्रोत कमी पडत आहे.*

*जो पर्यंत नवीन आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण होत नाहीत व अस्तित्वात असलेल्या स्त्रोतातुन पूर्ण क्षमतेने उत्पन्न प्राप्त करण्यासाठी प्रयत्न होणार नाहीत तो पर्यंत विकास कामे हाती घेण्यासाठी बाधा येणार आहे, ही बाब विचारात घेऊन सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाच्या सुरुवातीपासुन कर वसुली, पाणीपट्टी वसुली, व्यापारी संकुले व इतर इमारती भाडे वसुली इ. बाबींचे नियोजन करण्यात येऊन विकास कामांना योग्य प्रमाणात निधी उपलब्ध करुन देण्याचा आगामी सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पाच्या माध्यमातुन मी प्रयत्न करणार आहे. माझ्या या प्रयत्नांना महानगरपालिकेचा प्रशासकीय प्रमुख म्हणून मला आपले व सर्व सन्माननीय सदस्यांचे सहकार्य अपेक्षित आहे.*

*<u>जमा बाजु : -</u>*

***१) स्थानिक स्वराज्य संस्था कर :-***

*सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षात प्रशासनामार्फत स्थानिक संस्था करापोटी रु.२३५.०० कोटीचे उद्दिष्ट निश्चित केले होते. स्थायी समितीने या मध्ये रु.२५.०० कोटीची वाढ करुन रु.२६०.०० कोटीचे उद्दिष्ट दिले होते, सर्वसाधारण सभेने सदर उद्दिष्टांमध्ये रु.४०.०० कोटीची वाढ करुन रु.३००.०० कोटीचे उद्दिष्ट पुर्तीसाठी निश्चित केले आहे. डिसेंबर २०१६ अखेर रु.१८०.९४ कोटी प्राप्त झालेले असल्यामुळे व उर्वरित तीन महिण्याचे अपेक्षित उत्पन्न लक्षात घेता चालु वित्तीय वर्ष सन २०१६-२०१७ करीता स्थानिक संस्था करापोटी रु.२६०.०० कोटीचे सुधारित उद्दिष्ट ठरविण्यात येत आहे.*

*तसेच पुढील आर्थिक वर्षाकरिता केंद्र शासनामार्फत वस्तू आणि सेवा कर ( Goods & Service Tax ) लागु होण्याची शक्यता लक्षात घेता, स्थानिक स्वराज्य संस्था करापोटी शासनाकडुन अनुदान स्वरुपात प्राप्त निधी विचारात घेऊन स्थानिक संस्था कराचे उद्दिष्ट रु.२७५.०० कोटी ठरविण्यात येत आहे.*

***२) मालमत्ता कर :-***

*महानगरपालिकांचा मालमत्ता कर हा स्थायी उत्पन्न असणारा एकमेव मुख्य आर्थिक स्त्रोत आहे. नागरी वसाहतींच्या तुलनेत मालमत्ता कराच्या उत्पन्नात वाढ झालेली दिसुन येत नाही. या स्त्रोतांतर्गत मोठया प्रमाणावर उत्पन्न वाढीसाठी वाव आहे. त्यासाठी शहरातील मालमत्तांचे पुनःसर्वेक्षण करुन त्या माध्यमातुन उत्पन्न वाढीचा प्रयत्न करण्याच्या दृष्टीकोनातुन चालु वित्तीय वर्षात निविदा काढण्यात आल्या होत्या तथापि सदर निविदेस आवश्यक प्रतिसाद मिळालेला नाही.त्यामुळे प्रस्तावित काम प्रलंबित आहे. या कारणामुळे मालमत्ता कर वसुलीमध्ये अपेक्षित वाढ झालेली नाही.*

*सन २०१६-२०१७ या वर्षात प्रशासनाने मालमत्ता करापोटी रु.२३०.०० कोटीचे उद्दिष्ट निश्चित केले होते. स्थायी समितीने या मध्ये रु.२०.०० कोटीची वाढकरुन रु.२५०.०० कोटीचे उद्दिष्ट दिले होते, सर्वसाधारण सभेने सदर उद्दिष्टांमध्ये रु.४०.०० कोटीची वाढ करुन रु.२९०.०० कोटीचे उद्दिष्ट पुर्तीसाठी निश्चित केले आहे. डिसेंबर २०१६ अखेर रु.५७.९० कोटी प्राप्त झालेले असल्यामुळे व उर्वरित तिन महिण्याचे अपेक्षित उत्पन्न लक्षात घेता चालु वित्तीय वर्ष सन २०१६-२०१७ करीता मालमत्ता करापोटी रु.१००.०० कोटीचे सुधारित उद्दिष्ट ठरविण्यात येत आहे.*

*शहरातील मालमत्तेचे पुनःमुल्यांकन व पुनःसर्वेक्षणसाठी नवीन निविदा अंतिम करुन G.I.S. Based Property Assessment करण्यात येऊन मालमत्ता कर वसुलीत निश्चित स्वरुपात वाढ करण्याचा प्रशासनाचा मानस राहील. हा दृष्टीकोन समोर ठेवुन सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाकरीता मालमत्ता करापोटी रु.२३०.०० कोटीचे उद्दिष्ट ठरविलेले आहे.*

### ३) नगर रचना विभागापासुन प्राप्त होणारे उत्पन्न

*सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षात प्रशासनाने रु.७०.०० कोटीचे उद्दिष्ट निश्चित केले होते. स्थायी समितीने या मध्ये रु.१०.०० कोटीची वाढ करुन रु.८०.०० कोटीचे उद्दिष्ट दिले होते, सर्वसाधारण सभेने सदर उद्दिष्टांमध्ये रु.२०.०० कोटीची वाढ करुन रु.१००.०० कोटीचे उद्दिष्ट पुर्तीसाठी निश्चित केले आहे. डिसेंबर २०१६ अखेर रु.३७.६५ कोटी प्राप्त झालेले असल्यामुळे व उर्वरित तिन महिण्याचे अपेक्षित उत्पन्न लक्षात घेता चालु वित्तीय वर्ष सन २०१६-२०१७ करीता मालमत्ता करापोटी रु.५०.१० कोटीचे सुधारित उद्दिष्ट ठरविण्यात येत आहे.*

*नवीन विकास नियंत्रण नियमावली अंतर्गत Paid FSI च्या सुधारीत दरानुसार अपेक्षित उत्पन्न लक्षात घेता तसेच अनाधिकृत बांधकामास आळा घालण्याकरीता सक्षम यंत्रणा कार्यान्वीत करण्यात येईल त्यामुळे बांधकामधारक बांधकाम परवानगी घेऊन बांधकाम करतील पर्यायाने नगररचना विभागाच्या उत्पन्नात वाढ होईल. तसेच नगर रचना विभागांतर्गत शहर विकास निधी, बेटरमेंट चार्जेस, प्रिमियम, दंड, मोबाईल टॉवर शुल्क, नामांतर शुल्क व नव्याने समावेश झालेल्या सातारा देवळाई येथील विकसनशील भागातील बांधकाम परवाना शुल्क इत्यादी पासुन सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षात रु.१००.०० कोटीचे उत्पन्न अपेक्षित आहे. हे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी प्रशासकीय यंत्रणेस पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करण्यात येईल.*

### ४) शासकीय अनुदाने व खर्च प्रतिपुर्ती :-

*सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिकेने शासकीय अनुदान खर्च प्रतिपुर्ती पोटी प्रशासनाने रु.७६.७७ कोटीचे उत्पन्न अपेक्षित धरले होते. यामध्ये प्रामुख्याने रस्ते दुरुस्ती अनुदान, मलेरिया वेतन अनुदान, कुटुंब कल्याण वेतन अनुदान, प्राथमिक शिक्षण वेतन अनुदान, जमीन महसुली व बिगर शेतसारा अनुदान, विशेष शासकीय अनुदान इत्यादीचा समावेश आहे. या मध्ये स्थायी समितीने रु.३१.०० कोटीची वाढ करुन रु.१०७.७७ कोटीचे उत्पन्न निश्चित केले होते. सर्वसाधारण सभेने यात रु.८८.१७ कोटीची वाढ करुन रु.१९५.९४ कोटीचे उत्पन्न निश्चित केले. यामध्ये मनपा शाळा व इमारत भाडेपोटी शासनाकडुन रु.८३.१७ कोटीचा समावेश आहे. सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षात शासकीय अनुदाने व खर्च प्रतिपुर्ती पोटी रु.४४.२० कोटी अनुदान प्राप्त झाले आहे व सन २०१६-१७ करिता रु.५८.८९ कोटी सुधारित उद्दिष्ट निश्चित केलेले आहे.*

*सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षाकरीता रु.८०.६० कोटीचे उद्दिष्ट निश्चित केलेले असुन यामध्ये प्रामुख्याने रस्ते दुरुस्ती अनुदान,मलेरिया वेतन अनुदान, कुटुंब कल्याण वेतन अनुदान, प्राथमिक शिक्षण वेतन अनुदान, जमीन महसुली व बिगर शेतसारा अनुदान, विशेष शासकीय अनुदान इत्यादीचा समावेश आहे.*

### *५)     पाणीपटटी वसुली :-*

*सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षाकरीता महानगरपालिकेने पाणीपट्टी वसुलीपोटी रु.९५.२२ कोटीची तरतुद केलेली होती. या मध्ये महानगरपालिकेकडुन रु.४३.५० कोटी इतकी रक्कम औरंगाबाद सिटी वॉटर युटीलीटी कंपनी लि. कडे पी.पी.पी. करारनाम्यानुसार देण्याची तरतुद करण्यात आली होती व उर्वरित रक्कम रु.५१.७२ कोटी महानगरपालिकेने स्वत:चे उत्पन्न गृहीत धरले होते.*

*मा. सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार ०१ ऑक्टोबर २०१६ पासुन औरंगाबाद सिटी वॉटर युटीलीटी कंपनी लि. बरोबर झालेला करार रद्द करण्यात आला असुन सद्यस्थितीत सदर प्रकरण मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार आहे त्या स्थितीत कार्यान्वित आहे. त्यामुळे चालु वित्तीय वर्षात पाणीपट्टी वसुली पोटी रु.४३.२३ कोटीची सुधारित उद्दिष्ट निश्चित केले आहे. डिसेंबर २०१६ अखेर महानगरपालिकेस रु.३०.२१ कोटी इतके उत्पन्न प्राप्त झाले आहे.*

*सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षाकरीता पाणीपट्टी वसुलीपोटी रु.११२.३० कोटीचे उद्दिष्ट निश्चित करण्यात येत आहे. जे व्यावसायिक नळधारक घरगुती नळ दर्शवुन पाणीपट्टी भरत असतील अश्या व्यावसायिकांचा शोध घेण्यात येईल. अनधिकृत नळ धारकांचे नळ दंडात्मक शुल्क आकारुन नियमीत करुन घेण्यात येतील व बांधकाम पुर्णत्व प्रमाणपत्रापासुन त्यांच्याकडुन पाणीपट्टी वसुली करण्यात येईल तसेच थकबाकी वसुली धारकांचे नळ तातडीने बंद करुन पाणीपट्टी वसुली झाल्यानंतर नियमित करण्यात येतील.*

### *६) महानगरपालिकेच्या मालमत्ता पासुन प्राप्त होणारे उत्पन्न :-*

*शहरात महानगरपालिकेचे शॉपिंग काम्प्लेक्स, रंग मंदिर, संशोधन केंद्र, सामाजिक सभागृह तसेच मंगल कार्यालये याचा आढावा घेण्यात येवुन उत्पन्नात वाढ कशी करण्यात येईल यासाठी प्रयत्न करण्यात येतील. त्या आधारे या विभागाकडुन सन २०१७-१८ करिता रु.१०.०० कोटीचे उत्पन्न अपेक्षित आहे. सन २०१६-१७ वित्तीय वर्षात रु.१० .०० कोटीचे उद्दिष्ट अपेक्षित होते, डिसेंबर-१६ अखेर रु.३.०९ कोटी प्राप्त झाले असुन सुधारित उद्दिष्ट रु.४.५० कोटीचे ठेवण्यात आले आहे.*

## *सन २०१७-२०१८ च्या प्रस्तावित अर्थसंकल्पातील अपेक्षीत खर्चाचे ठळक बाबी*

### *१.     प्रशासकीय खर्च :-*

*सन २०१६-२०१७ या आर्थिक वर्षात एकुण रू.१९३.७६ कोटी इतका प्रशासकिय खर्च प्रशासनाने प्रस्तावित केला होता, सदर खर्चात प्रामुख्याने अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते व इतर प्रशासकीय खर्चाचा समावेश होता. सन २०१६-१७ या वित्तीय वर्षात ०१ ऑक्टोबर २०१६ पासुन औरंगाबाद सिटी वॉटर युटीलीटी कंपनी लि. यांच्या सोबतचा पी.पी. पी. तत्वावरचा करार*

*संपुष्टात आलेला असल्यामुळे व सद्यस्थितीत मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार जैसे थे परिस्थिती असल्यामुळे महानगरपालिका शहरातील नागरीकांना पाणी पुरवठा करीत असल्यामुळे काही प्रमाणात प्रशासकीय खर्चात वाढ झाली आहे, पर्यायाने वेतन व भत्ते, प्रशासकीय खर्चात वाढ होऊन सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षाकरीता रु.२१८.८५ कोटी सुधारीत खर्च प्रस्तावित करण्यात येत आहे.*

*तसेच सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षासाठी रु. २४६.०८ कोटीचा खर्च प्रशासनाने प्रस्तावित केलेला आहे. या मध्ये प्रामुख्याने कर्मचा-यांच्या वेतनापोटी रु. २२०.४१ कोटी, अग्निशमन विभागाकरीता गणवेश व अनुषंगिक साहित्य खरेदी पोटी रु.५०.०० लक्ष, कर्मचा-यांचे वैद्यकीय खर्च प्रतिपुर्ती पोटी रु.७५.०० लक्ष, अभिलेख कक्ष Digitisation खर्च पोटी रु.५०.०० लक्ष, रस्त्यामधील बाधीत अतिक्रमणे काढण्याच्या कामासाठी बंदोबस्त प्रित्यर्थ पुर्वी घेण्यात आलेल्या पोलीस दलाचे थकीत देयके अदा करण्यासाठी रु.१.०० कोटी, कार्यालयीन इमारतीच्या विद्युत देयक खर्चापोटी रु.४.५० कोटी, वाहन इंधनापोटी रु.५.५० कोटी, वाहन देखभाली पोटी रु.१.५० कोटी, Outsourcing Salary साठी रु.५.०० कोटी इत्यादीचा समावेश आहे.*

***२. विद्युत खर्च :-***

*शहरातील पथदिवे बदलणे व दुरुस्ती करणे, रस्त्यावरील पथदिव्यांची विद्युत देयके अदा करणे ही कामे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बीओटी तत्वावर देण्यात आलेली असुन सदरील कामांसाठी सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाच्या अर्थसंकल्पात रु.३५.०५ कोटीची तरतूद करण्यात आली आहे.*

***३. घन कचरा व्यवस्थापण खर्च :-***

*औरंगाबाद शहर हे स्वच्छ व कचरामुकत करण्यासाठी शहरातील कचरा दैनंदिन व वेळीच उचलुन त्यावर योग्य प्रक्रिया करण्याच्या हेतुने प्रथम टप्प्यात घन कचरा व्यवस्थापण अंतर्गत निम्ननिर्दिष्टानुसार प्रायोगिक तत्वावर उपाययोजना राबविण्याचा संकल्प आहे. या मध्ये शहरातील सर्व सन्माननिय पदाधिकारी, सर्व सन्माननिय सदस्य व शहरातील सर्व नागरीक प्रशासनास सहकार्य करतील अशी मी अपेक्षा बाळगतो.*

- *खाजगी तत्वावर बचत गटामार्फत साफसफाई*
- *खाजगी तत्वावर साफसफाई वाहतुक खर्च*
- *स्वच्छ शाळा, महाविद्यालये, ले-आऊट*
- *प्रोत्साहन पर बक्षिस योजना*
- *सनिटरी नॅपकीन वेस्टेज विल्हेवाट*
- *हगनदारीमुक्त जनजागृती अभियान*
- *वाहनांना G.P.R.S. प्रणाली बसविणे*

- *सफाई कामगारांसाठी गणवेश व तत्सम साहित्य खरेदीबायो मिथेन थर्मल कंपोस्टींग ०५ टन क्षमतेचे प्रकल्प उभारणे.*
  - *प्रति झोन कार्यालय रॅम्प उभारणे.*
  - *शहरातील संकलित कच-याची शास्त्रोक्त*
  - *पध्दतीने विल्हेवाट लावणे.*
  - *लहान स्विपिंग मशिन खरेदी करणे.*
  - *५० नग ॲटो हॉपर्स व बिन्स खरेदी करणे.*
  - *ट्रॅक्टर लोडर खरेदी करणे*
  - *बल्क रिफयुज कॅरीअर खरेदी करणे - ०५ नग.*

*इत्यादी करीता सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाकरीता रु.२४.८३ कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे, जेणेकरुन आपले ऐतिहासिक शहर स्वच्छ व सुंदर राहण्यास मदत होईल.*

***४. शहरातील नागरीकांना आरोग्य सुविधा पुरविणे***

*शहरातील नागरीकांना विशेष दर्जाच्या आरोग्य सुविधा पुरविण्याचा मानस असुन या करीता सन २०१७-२०१८ च्या अर्थसंकल्पात काही विशेष तरतुदी केलेल्या असुन या मध्ये प्रामुख्याने महानगरपालिकेच्या आरोग्य केंद्रात डायलॉसिस सेन्टर उभारणे रु.२.०० कोटी, एक्सरे मशिन खरेदी करणे रु.५०.०० लक्ष, सर्व सोयी युक्त रुग्ण वाहिका खरेदी करणे रु.७०.०० लक्ष, पॅथॉलॉजी लॅब सुरु करणे रु. ५०.०० लक्ष, फिरते आरोग्य सेवा केंद्रासाठी वाहन खरेदी करणे, रु. ५०.०० लक्ष, डेन्टल चेअर खरेदी करणे रु.१०.०० लक्ष इत्यादींचा समावेश आहे.*

***५. शिक्षण विभाग सुविधा पुरविणे :-***

*महानगरपालिकेतील शाळांमध्ये सर्वसामान्यपणे गरीब व होतकरु विद्यार्थी शिक्षण घेत असतात, सदर विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेमध्ये वाढ करण्यासाठी खालील प्रमाणे विशेष तरतुदी करण्यात आलेल्या आहे.*

- *महानगरपालिका शाळेत प्रयोग शाळा कार्यान्वित करणे व विज्ञान साहित्य खरेदी*
- *महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना गाईड व इतर साहित्य पुरविणे*
- *विद्यार्थ्यांचा गुणवत्ता विकास स्पर्धात्मक उपक्रम व मागदर्शन केंद्र सुरु करणे*
- *संगणक लॅब, ई-लर्नींग डिजीटल क्लासरुम. Science Lab.*
- *माध्यमिक शाळांसाठी साहित्य खरेदी व शैक्षणिक सहल*
- *महानगरपालिकेमार्फत सेमी इंग्लिश शाळा सुरु करणे*
- *आर्थिक दृष्टया दुर्बल व मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह सुरु करणे*
- *डयुल डेस्क बेंचेस खरेदी करणे*

- *महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना बस पास सेवा मोफत पुरविणे*
- *एच .आय. व्ही. बाधीत बालकांना पोषक आहार व शालेय साहित्य पुरवठा करणे*
- *मॉडल स्कुल निर्माण करणे*
- *आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या पाल्यांसाठी वस्ती गृह चालविणे*
- *महानगरपलिकेच्या शाळेत स्टोअर रुम बांधणे*
- *महानगरपालिकेच्या शाळेतील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी शिकवण वर्ग घेणे*
- *महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांसाठी समर कॅंप*
- *महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना कोचींग क्लासेस मध्ये प्रवेश देणे*
- *महानगरपालिका शाळेतील विद्यार्थ्यांना राष्ट्रीय प्रज्ञाशोध परिक्षेसाठी विशेष प्रशिक्षण*

***६. क्रीडा विभाग :-***

*महानगरपालिकेतील सर्व शाळेत क्रीडा साहित्य खरेदी करीता प्रत्येकी रु. ०१.०० लक्षची तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच महापौर चषक क्रीडा स्पर्धा, जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा, अंतर महानगरपालिका क्रीडा स्पर्धा, महानगरपालिका शाळा क्रीडा स्पर्धा याकरीता तरतुद करण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त महानगरपालिकेची सर्व प्रकारची क्रीडांगणे दुरुस्ती करीता रु.५०.०० लक्षची विशेष तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच शहरात लॉन टेनिस, कुस्ती व फुटबॉल मैदान विकसीत करण्यासाठी रु.५०.०० लक्षची विशेष तरतुद करण्यात आलेली आहे. या व्यतिरिक्त महानगरपालिकेचे गरवारे क्रीडा संकुल, पव्हेलियन सुधारणा करण्यासाठी रु.०१.०० कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे.*

***७. महिला व बाल कल्याण विभाग :-***

*सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात महिला व बाल कल्याण विकास कार्यक्रमांतर्गत महिलांसाठी व बालकांसाठी विविध योजना, प्रशिक्षणे तसेच शासन निर्णयात नमुद इतर तत्सम योजना कार्यान्वित करण्यात येणार आहे. यासाठी रु.६.०० कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे.*

***८. दिव्यांग (अपंग) व्यक्तीसाठी विविध कल्याणकारी योजना राबविणे:***

*दिव्यांग (अपंग) व्यक्तीसाठी विविध कल्याणकारी योजना स्थानिक स्वराज्य संस्थांनी राबविण्याचे शासनाचे निर्देश आहेत, या घटकांसाठी सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात रु.५.५० कोटीची भरीव तरतुद करण्यात आलेली आहे. या मध्ये सन २०१६-२०१७ च्या उर्वरित रु.२.५० कोटीच्या तरतुदीचा समावेश आहे.*

### ९. अग्निशमन विभाग :

सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात अग्निशमन विभागाकरीता अग्निशमन वाहन खरेदी करीता रु.८.०० कोटी व विभागीय आपत्कालीन व्यवस्थापण अंतर्गत शहरात हर्सुल, पडेगाव, टि.व्ही. सेंटर व शहागंज येथे अग्निशमन केंद्रे उभारणी करीता व करोडी येथील जिल्हाधिकारी कार्यालयाकडुन महानगरपालिकेकडे हस्तांतरीत करण्यात आलेल्या जागेस संरक्षित भिंत बांधणे साठी एकत्रित रु.५.५० कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे.

### १०. नवीन उद्याने :

सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात नवीन उद्याने अंतर्गत खालील प्रमाणे विशेष तरतुदी करण्यात आलेल्या आहे.

- हिंदु ह्रदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्मृती स्मारक उभारणे
- हर्सुल तलाव येथे नौकायन सुरु करणे
- हिमायत बाग येथे जैव विविधता पार्क ( बायो डायव्हरसिटी पार्क) उभारणे
- जांभुळबन येथे ऑक्सिजन पार्क उभारणे
- बॉटनीकल गार्डन येथे खेळणी व खुले व्यायाम केंद्र उभारणे
- स्वामी विवेकानंद उद्यान येथे साहसी खेळांसाठी वास्तु उभारणे

### ११. प्रधानमंत्री आवास योजना :

सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात केंद्र शासनामार्फत राबविण्यात येणा-या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सर्वांसाठी घरे या प्रकल्पांतर्गत नियोजन आराखडा तयार करण्याकामी एजन्सी नियुक्त करणे, सर्वेक्षण करणे व इतर अनुषंगीक कामे करणे यासाठी अर्थसंकल्पात रु.५.०० कोटीची तरतुद करण्यात आली आहे.

### १२. नावीन्य पूर्ण संकल्पना (Smart Innovation) :

सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात नावीन्य पुर्ण संकल्पना (Smart Innovation) अंतर्गत खालील बाबींची अंमलबजावणी करण्याचा मानस आहे.

- स्मार्ट पार्कींग सिस्टीम
- स्मार्ट बस स्टॉप
- स्ट्रीट स्विपिंग व डस्टबीन मशीन
- महानगरपालिका कर्मचा-यांसाठी कॅपिसीटी बिल्डींग ॲन्ड मोटीवेशन
- पेडेस्ट्रिएन पॉलीसी फुटपाथ व इतर
- मयतासाठी शितगृह (Cold Storage Room)
- मॅपींग ऑफ युटीलीटीज
- इंटिलीजन्ट सोलार पॉवर लाईट
- पेडेस्ट्रिएन अँड बायसायकल ॲक्टीव्हिटी सेंटर

- *सुपरव्हिजन ऑफ एस.डब्ल्यु. एम.*
- *विज्ञान प्रदर्शन*
- *हॉकर्स झोन विकसित करणे*
- *महानगरपालिका पाण्यांच्या टाकीवर Water Level Sensor बसविणे व Indicator बसविणे*
- *Public Participatory Budget for All Election Ward Rs.१.०० Lac*
- *आपत्कालीन व्यवस्थापण (Disaster Management)*
- *मुलांसाठी लवकर हस्तक्षेप योजना ( Early intervention Scheme for Children )*
- *नेत्रदान जन जागृती (Identification of cases)*
- *आंतरराष्ट्रीय भाषा शिकवण (International Languages Learning )*
- *पर्यटन ग्रेडींग डिजिटल जाहिरात (Digital Promotation of Tourism Grading )*
- *स्मार्ट अंगणवाडी*
- *जंक्शन सुधारणा*

- ***नावीन्य पुर्ण संकल्पना (Smart Solution) :***
- *सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात नावीन्य पुर्ण संकल्पना (Smart Solution) अंतर्गत खालील बाबींची अंमलबजावणी करण्याचा मानस आहे.*
- *सिटी डॅश बोर्ड ( City Dash Board)*
- *सि. सि. टि. व्ही. सर्व्हेलन्स (C. C. T.V. Surveillance)*
- *आपत्कालीन प्रतिसाद (Emergency Response System)*
- *घन कचरा व्यवस्थापण मोबाईल ॲप (Mobile App for Solid Waste Management)*
- *घन कचरा ऑपरेशन केंद (Solide Waste Operation Centre)*
- *सार्वजनिक माहिती प्रणाली (Public Information System)*
- *प्रसारण गुणवत्ता नियंत्रण केंद्र (Air Quality Control Centre)*
- *डेटा विश्लेषण केंद्र (Data Analytics Centre)*
- *वन वेब साईट ॲप (One Web Site App)*

- *स्मार्ट ग्रिड अँड एनर्जी व्यवस्थापण (Smart Grid and Energy Management)*
- *टुरीझम मोबाईल अॅप ( Tourism Mobile App)*
- *ऑनलाईन सिस्टीम वॉटर कनेक्शन (Online System Water Connection)*
- *गुणवत्ता नियंत्रण लॅब (Quality Control Lab)*

***१४. प्रो - पुअर बजेट :***

*सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात रु.२०.८० कोटीची तरतुद करण्यात आलेली असुन यामध्ये रु.१३.७० कोटी नवीन विकास कामांसाठी व उर्वरीत रक्कम रु.७.१० कोटी सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षातील स्पिल कामांसाठी राखीव ठेवण्यात आलेले आहे. रु.१३.७० कोटी मधुन बहुतांश कामे ही ड्रेनेज लाईनची असुन ज्यामुळे UIDSSMT अंतर्गत मल - जल नि:सारण वाहिण्या टाकणे व मल - जल पक्रिया प्रकल्प उभारणे व Open Defecation Free (ODF) या केंद्र शासनाच्या योजनेस मदत होईल, अशी अपेक्षा आहे.*

***१५. हेरिटेज वास्तु संवर्धन***

*या शहराची ५२ दरवाजांचे शहर म्हणुन ओळख असुन या ५२ दरवाजांपैकी काही महत्वाचे ऐतेहासिक दरवाजांचे जतन व संवर्धन करण्यासाठी या अर्थसंकल्पात रु.५०.०० लक्षची तरतुद करण्यात आलेली आहे.*

*शहर हद्दीतील हर्सुल तलाव व लगतच्या परिसराचे सुशोभिकरण व विकास करण्यासाठी रु.१.०० कोटीची विशेष तरतुद करण्यात आलेली आहे.*

***१६. सायकल ट्रॅक व फुटपाथ :***

*शहरातील प्रसिध्द असलेले बीबीका मकबरा ते औरंगाबाद लेणी पर्यंत सायकल ट्रॅक व फुटपाथ तयार करण्याची या आर्थिक वर्षात संकल्पना असुन या करीता रु.१.०० कोटीची विशेष तरतुद ठेवण्यात आली आहे.*

***१७. नाटयगृहे :***

*संत एकनाथ रंग मंदिर व संत तुकाराम नाटय गृह या महानगरपालिकेच्या नाटय गृहांच्या देखभाल - दुरुस्ती, आसन व्यवस्था, ध्वनी व्यवस्था, विद्युत व्यवस्था व इतर कामांसाठी अनुक्रमे रु.५०.०० लक्ष व रु.८०.०० लक्षची विशेष तरतुद करण्यात आलेली आहे.*

***१८. पाणी पुरवठा व्यवस्था :***

*सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात पाणी पुरवठा महसुली खर्चापोटी रु.७७.१२ कोटीची तरतुद खालील प्रमाणे करण्यात आलेली आहे,*

***लेखाशिर्ष तरतुदी***

*गोदावरी विकास महामंडळ रु. २.७५ कोटी*

*महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी रु. ४७.०० कोटी*
*देखभाल दुरुस्ती वार्ड अभियंता ०१ते०९रु१५.५० कोटी*
*जायकवाडी ते शहर मुख्य जलवाहिनी दुरुस्ती रु.१.५० ोटी*
*मशिनरी देखभाल दुरुस्ती रु. २.०० कोटी*
*टँकर भाडे रु. ६.०० कोटी*
*प्रदुषण व वॉटर सेस हमी शुल्क व इतररु. २.३५ कोटी*
*पाणी पुरवठा वितरण व्यवस्था कामे रु.१.०० कोटी*

*शहरातील नागरीकांना जायकवाडी धरणातुन पाणी पुरवठा करण्यात येतो. सदर धरण शहरापासुन ४५ कि.मी. अंतरावर आहे. एकुण ०६ ठिकाणापासुन पाणी उचल करावी लागते. त्यामुळे महानगरपालिकेस प्रति नळ पाणी पुरवठा करण्यासाठी खर्च रु. ७०००/- अंदाजे येतो. प्रत्यक्षात मात्र रु. ३७००/- प्रति वर्ष नागरीकांकडुन वसुल करण्यात येते, त्यामुळे साधारणतः ५०% अतिरिक्त खर्च अ- अंदाजपत्रक महसुली उत्पन्नातुन क-अंदाज पत्रकात पाणी पुरवठा कामांसाठी वर्ग करावा लागतो.*

***१९. कर्ज परतफेड :***

*सन २०१७-२०१८ या वित्तीय वर्षात शहरातील पाणी पुरवठा योजना व जल निःसारण योजना प्रभावीपणे राबविण्यासाठी आयुर्विमा महामंडळ, खुल्या बाजारातून महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामार्फत घेण्यात आलेले कर्ज, आय.डी.बी.आय. कडून घेण्यात आलेल्या कर्जाची परतफेड दरवर्षी मुद्दल व व्याज स्वरूपात करावी लागते. या करिता कर्ज परतफेडीसाठी या अर्थसंकल्पात रू.४५.०० कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे.*

***२०. जल निःसारण व्यवस्था :***

*सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षात ड्रेनेज देखभाल दुरुस्ती खर्चापोटी प्रति वार्ड अभियंता कार्यालय रु. १.०० कोटीची तरतुद करण्यात आलेली आहे. तसेच नाले साफ-सफाई करीता प्रति वार्ड कार्यालय रु.३०.०० लक्षची तरतुद करण्यात आलेली आहे.*

***अशा प्रकारे सन २०१७-२०१८ या वित्तिय वर्षासाठी महसुली व भांडवली कामांसाठी खालील प्रमाणे ठळक तरतुदी बाबतचे विवरण लेखाशिर्ष तरतुद (रु.)***

- *सन २०१६-२०१७ या वित्तीय वर्षात जी कामे मंजुर झालेली आहे*
- *अशी कामे पुढील आर्थिक वर्षात पुर्ण होणार असल्यामुळे या करीता स्पिल ओव्हर कामांसाठी तरतुद २३८,३९,४५,०००/-*
- *शासन पुरस्कृत योजनांसाठी महानगरपालिकेचा हिस्सा ४०,००,००,०००/-*
- *विकास योजनेअंतर्गत विकास काम १६,५०,००,०००/-*
- *प्रो-पुअर बजट अंतर्गत कामे १३,७०,००,०००/-*
- *विकास योजनांसाठी भुसंपादन २५,००,००,०००/-*

- प्रति वार्ड अभियंता कार्यालय रस्ते दुरुस्ती पॅच वर्क
  ९,००,००,०००/-
- प्रति वार्ड अभियंता कार्यालय पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती
  ९,००,००,०००/-
- प्रति वार्ड अभियंता कार्यालय जल निःसारण देखभाल
  दुरुस्ती ९,००,००,०००/-
- सिध्दार्थ जल तरण तलाव दुरुस्तीसाठी १,००,००,०००/-
- महिला व बालकल्याण योजना ६,००,००,०००/-
- दिव्यांगासाठी तरतुद ५,५०,००,०००/-
- सातारा देवळाई प्रशासकीय इमारत ५०,००,०००/-
- प्रधानमंत्री आवास योजना ५,००,००,०००/-
- सायकल ट्रॅक व फुटपाथ १,००,००,०००/-
- हर्सुल तलाव विकास कामे व सुशोभिकरण१,००,००,०००/-

करीता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०३ व १०४ नुसार सन २०१६-२०१७ चे सुधारित अंदाज जमा रु. ५८०,९६,६५,०००/- यामध्ये प्रारंभीची शिल्लक रु.७५,०१,८४,०००/- यासह एकुण जमा रु.६५५,९८,४९,०००/- आणि एकुण खर्च रु. ५८६,६०,३०,०००/- लक्षात घेता रु.६९,३८,१९,०००/- शिलकीचे सुधारीत अर्थसंकल्प मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

त्याच प्रमाणे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०१७-२०१८ चे जमा व खर्चाचे मुळ अंदाज यामध्ये प्रारंभीची शिल्लक रु.६९,३८,१९,०००/- व अपेक्षित जमा रु.८८१,०४,५०,०००/- असे एकुण रु. ९५०,४२,६९,०००/- आणि अपेक्षित खर्च रु.९५०,२१,५५,०००/- विचारात घेता रु.२१,१४,०००/- शिल्लकीचे जमा व खर्चाचे अंदाज मा.स्थायी समितीसमोर मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

माझ्या कार्यकाळात सभापती, विधानसभा महाराष्ट्र राज्य मा.श्री हरीभाऊजी बागडे, मा. पर्यावरण मंत्री, महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री, औरंगाबाद श्री रामदासजी कदम, मा. खासदार श्री. चंद्रकांतजी खैरे, मा. खासदार श्री रावसाहेबजी दानवे, मा. खासदार राज्य सभा श्री.राजकुमारजी धुत, मा. आमदार श्री. संजयजी शिरसाट,औरंगाबाद(पश्चिम),श्री.अतुलजी सावे औरंगाबाद (पुर्व), मा.आमदार श्री.इम्तियाजजी जलील औरंगाबाद (मध्य), मा.आमदार श्री.सतीष चव्हाण,मा.आमदार श्री.सुभाषजी झांबड, मा.आमदार श्री विक्रमजी काळे यांचे सहकार्य व मागदर्शन लाभेल अशी अपेक्षा व्यक्त करतो.

तसेच मा.महापौर,मा.उपमहापौर, मा.सभापती स्थायी समिती, मा.सभागृह नेता, मा.विरोधी पक्ष नेता तसेच सर्व पक्षाचे गटनेते व

*स.सदस्य यांचे सुध्दा सहकार्य मला लाभेल याचा मला पूर्ण विश्वास आहे .*

*तसेच सर्व पत्रकार बंधु, इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमे व औरंगाबाद आकाशवाणी इत्यादी आपण सर्व महानगरपालिकेच्या लोकाभिमुख प्रकल्प व विकास योजनांना प्रसिध्दी देऊन महानगरपालिकेस सहकार्य करतील या अपेक्षेसह सर्वांचे धन्यवाद* !

श्रीमती शेख समीना : प्रशासनाकडुन हे बजेट अपेक्षित नव्हते, औरंगाबादला दुसरे हेरिटेज सिटी म्हणुन ओळखले जाते, हेरिटेज वास्तुसाठी फक्त 50 लाख रूपये ठेवलेले आहे, ऐतिहासिक नहरीसाठी एक रूपयाही ठेवलेला नाही.

श्री.विकास ऐडके :बजेटमध्ये नहर ए अंबरसाठी काहीच तरतुद ठेवलेली नाही

श्री.राजगौरव वानखेडे : प्रशासनाने बजेट सादर केलेले आहे, या बजेटमध्ये कोणती तरतुद करायची आहे हा आपला अधिकार आहे.

श्री.कैलास गायकवाड :अभ्यास करण्याकरीता आठ दिवसांचा अवधी देण्यात यावा.

श्रीमती शेख समीना :नहर ए अंबरसाठी तरतुद ठेवलेली नाही, खुलासा करण्यात यावा.

मा.आयुक्त :बजेट मा.स्थायी समितीकडे सादर केलेले आहे त्याचा अभ्यास करावा. प्रशासनाने सादर केलेल्या बजेटमध्ये स्थायी समितीला काय suggest करायचे आहे ते स्थायी समितीच्या माध्यमातुन suggest करू शकता.

श्री.राजगौरव वानखेडे :प्रशासनाने उशीरा बजेट सादर केल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात येते.

मा.आयुक्त :निवडणूकीची आचारसंहिता असल्याने बजेट सादर करता आले नाही.

श्री.राजगौरव वानखेडे :प्रशासनाने बजेट सादर केलेले आहे, बजेटमध्ये अनेक नाविण्यपुर्ण बाबी केलेल्या आहे. त्याबद्दल अभिनंदन करण्यात येते. बजेटचा सविस्तर अभ्यास करण्यासाठी आठ दिवसांचा वेळ मिळावा ही विनंती .

श्रीमती शेख समीना :बजेट फेब्रुवारीच्या शेवटच्या आठवडयात येणे अपेक्षित होते, बजेटचा अभ्यास करण्याकरीता वेळ देण्यात यावा. सभा तहकूब करण्यात यावी.

श्रीमती किर्ती शिंदे :आदर्श सहा रस्त्यांची निवड केलेली आहे, त्या रस्त्यांच्या निविदेबाबत कोणती कार्यवाही केलेली आहे.

मा.आयुक्त :स्पिलओव्हरच्या कामांमध्ये त्याचा समावेश आहे.

श्री.नितीन चित्ते :सन 2017-18 चा अर्थसंकल्प प्रशासनाने सादर केलेला आहे. क्रीडा विभागासंदर्भात चांगले काम बजेटमध्ये केलेले आहे. आरोग्य विभागा अंतर्गत आरोग्य सुविधा संदर्भात चांगली सोय केलेली आहे. औरंगाबाद मध्ये घाटी सारखे एक मोठे रूग्णालय असायला हवे, कॉर्पोरेट क्षेत्राला यामध्ये अंतर्भुत करून रुग्णालयाची चांगली योजना आणावी. नगरसेवकांच्या निगडीत काही गोष्टी आहेत. वर्क ऑर्डर झालेले कामे सुटलेले आहेत त्यांचा समावेश यामध्ये करण्यात यावा. माझ्या वार्डातील वर्ड ऑर्डर झालेले काम सुटलेले आहेत तसेच इतर स.सदस्यांचेही सुटलेले आहे त्या कामांचा बजेटमध्ये समावेश करण्यात यावा.

श्री.विकास एडके :सिटीबस विषयी बजेटमध्ये काहीच दाखवलेले नाही.

मा.आयुक्त :मा.पालकमंत्री यांचेसमवेत झालेल्या बैठकीत राज्य शासनाकडून 10 नविन बसेस प्राप्त झाल्यास विशिष्ट रूटवर बसेस चालवता येईल, महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बघता सिटीबस चालु करणे अवघड आहे. 10 बसेसचे प्रपोजल शासनाकडे पाठविलेले आहे.

श्रीमती किर्ती शिंदे :महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाण जास्त प्रमाणात दिसुन येत आहे त्या करीता महानगरपालिकेच्या रूग्णालयांमध्ये स्वतंत्र महिला डॉक्टर, महिला स्टाफसह सर्व सुविधा स्तनाच्या कर्करोगाचे निदान करण्यासाठी उपलब्ध करून देण्याची सुविधा करण्यात यावी.

श्रीमती शेख समीना :महानगरपालिकेतर्फे एक मेमोग्राफी सेंटर सुरू करण्यात यावे.

श्रीमती मनिषा मुंडे :गरीब महिला खाजगी रूग्णालयात आर्थिक परिस्थीती बिकट असल्याकारणाने तपासणी करू शकत नाही. त्यांचे सोईकरीता स.सदस्यांनी सुचविल्यानुसार मेमोग्राफी सेंटरची सुविधा देण्यात यावी.

मा.आयुक्त :प्रत्येक महिन्याच्या नऊ तारखेला ब्रेस्ट कॅन्सरच्या तपासणी करीता शिबीर आयोजित करण्यात यावी.

श्रीमती शेख समीना :तापडीया डायगोन्स्टिक सेंटरला लीजवर महानगरपालिकेने जागा दिलेली आहे. लीज संपलेली आहे भाडे तसेच कर भरलेला नाही, त्यांची लीज रद्द करण्यात यावी.

मा.सभापती :सन 2017-18 चा अर्थसंकल्प मा.आयुक्त यांनी सादर केलेले आहे. नविन कल्पना सभागृहासमोर मांडलेल्या आहेत. दिव्यांग व्यक्ती, महानगरपालिकेतील शाळा अत्याधुनिक असाव्यात, शहर स्मार्ट सिटीकडे वळत आहे. सर्व शहराचा आराखडा हा बजेटच्या माध्यमातुन सादर केलेला आहे. त्यांचीी कल्पना चांगली आहे ठरलेली कामे आहे ती होतील, चांगले नियोजन केलेले आहे. वसुलीकडे प्रशासनाला विशेष लक्ष द्यावे लागेत ते प्रशासनाने द्यावे वसुली वाढल्यास प्रशासनाने सादर केलेल्या सर्व कल्पना अस्तित्वात येतील. आयुक्त या शहरासाठी तासंनतास काम करत असतात. शहराच्या जनतेच्या हिताच्या सोबत सर्व स.सदस्य आपल्या सोबत आहेत. वसुलीवर लक्ष केंद्रित केले पाहीजे. वसुलीच्या प्रथेप्रमाणे फेब्रुवारीमध्ये वसुलीवर लक्ष केंद्रित केले जाते परंतु असे न करता एप्रिल पासूनच वसुलीवर लक्ष केंद्रित केले जावे. त्याबाबतचे नियोजन करण्यात यावे. जेने करून प्रशासनाने सादर केलेल्या कामांमध्ये यशस्वी होवुत. स.सदस्यांनी सभागृहात केलेल्या चर्चेनुसार काही कामांच्या वर्कऑर्डर झालेल्या आहेत. त्या कामांचा समावेश बजेटमध्ये करण्यात आलेला नाही. त्या सर्व कामांचा समावेश बजेटमध्ये करण्यात यावा. ऐतिहासिक वास्तुबाबत स.सदस्यांचे काही मत असल्यास ते मत देण्यात यावे. त्या बाबींचा कसा समावेश करता येईल तो येणा-या सभेमध्ये विचार करण्यात येईल. प्रयत्न करू. स.सदस्यांनी सुचविल्यानुसार प्रशासनाने सादर केलेल्या बजेटचा सविस्तर अभ्यास करण्यासाठी वेळ मागीतलेली आहे. त्यानुसार वेळ देण्यात येतो.

श्रीमती शेख समीना :महानगरपालिकेच्या इतिहासात पहिल्यांदास मुख्य लेखापरिक्षक यांनी मुख्यलेखाधिकारी पदाचा प्रभारी चार्ज असल्यामुळे त्यांचे अभिनंदन करण्यात यावे.

मा.सभापती :मा.आयुक्त आणि मुख्यलेखाधिकारी यांचे अभिनंदन करण्यात येते.

(यानंतर सभागृहातर्फे मा.सभापती मा.आयुक्तांचा पुष्पगुच्छ देवुन सत्कार करतात)

याच बरोबर मा.सभापती यांनी सभा तहकूब झाल्याचे घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद